(1)

Phone : 07232-240856
Phone : 07232-242456
Fax : 07232-244148

Phone : 07232-243504
Web Site: www.vngmcytl.ac.in
E-mail : deanvngmc@rediffmail.com
vngmcytlstore@gmail.com

**SHRI VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL**

# श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ

जा.क्र.श्रीवनाशावैमय/मध्य.भांडार/नवीन मुलींचे हॉस्टेल/मेस/3476/२१ दि.06/03/२०२१

## जाहीर ई-दरपत्रक

## नवीन मुलींचे वसतीगृहाकरिता मेस चालविण्याबाबत

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ या संस्थेतील नवीन मुलींचे वसतीगृहाकरिता मेस ११ महिण्याच्या करारावर देण्याकरिता अनुभवी परवानाधारक मेस चालकाकडून जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रक सादर करण्याची अंतिम दिनांक. १५/०३/२०२१ रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यंत असून दिनांक.१७/०३/२०२१ रोजी दुपारी १२:०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात येईल. दरपत्रक सादर करण्याऱ्या कंत्राटदार किंवा एका प्रतिनिधीस सदर सभेमध्ये उपस्थित राहता येईल.

**मेस चालविण्यासाठी दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१. **दरपत्रकधारकाचे आस्थापना नोदणी/दुकान नोंदणी/गुमास्ता नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटि प्रमाणपत्र, अन्न व औषध प्रशासनाचे इ. प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. तसेच दरपत्रकधारकास पुर्वानुभव असणे आवश्यक आहे. (त्यासंबंधीचे दस्तऐवज सादर करण्यात यावे.) अन्यथा दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही. अशा प्रकारचे दरपत्रक रदद करण्यात येईल.**

२. दरपत्रकाची बयाना रक्कम म्हूणन रुपये ३०,०००/- (तीस हजार) चा धनाकर्ष (डि.डि.) अधिष्ठाता श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचे नावे **स्विकृत कंत्राटदारास** (न्युनतम ठरणारे) दोन दिवसात सादर करावे लागेल.(धनादेश चालणार नाही)

३. **कंत्राट संबंधिच्या असलेल्या खालील सर्व नमुद अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रत्येक पानावर सही करुन सादर करावा लागेल.**

४. उपरोक्त सर्व बाबींचा समावेश असलेला लिफाफा तयार करुन त्यावर **तांत्रिक लिफाफा** असे नमुद करण्यात यावे. तसेच दरासंबंधीचा कागद वेगळया लिफाप्यात बंद करुन त्यावर **दराचा लिफाफा** व कंत्राटदाराने स्वतःचे नाव नमुद करुन झालेले दोन्ही लिफाफे **एका मोठया लिफाप्यात** बंद करावे लागतील व त्यावर ठळक अक्षरात **नवीन मुलींचे वसतीगृहातील मेस करिता दरपत्रक** असे नमुद करुन त्यावर स्वतःचे नाव संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक नमुद करुन व मोहोरबंद करुन दि.१५/०३/२०२० रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या आवक- जावक विभागाकडे पोहोचवावे लागतील. उशिराने प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

५.दिनांक. १७/०३/२०२० रोजी सकाळी १२:०० वाजता समिती समोर दरपत्रकाचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात येतील. त्यांच्या पडताळणी नंतर दराचे लिफाफे उघण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. किंमतीचे लिफाफे उधडण्यापुर्वी खाद्य पदार्थाचे आकारमान/वजन/प्रमाण इत्यादीची खात्री करुन घेण्याची आवश्यकता वाटल्यास त्यांचे नमुने मागविण्याचा अधिकार उपहारगृह/मेस समितीकडे राखुन ठेवलेला आहे.

६. जे कंत्राटदार या संस्थेत मेस चालवित आहे अशा सर्वांना या दरपत्रक प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

७. न्युनतम ठरलेल्या कंत्राटदारास मेस चालविण्याकरिता चे आदेश मुलींचे वसतीगृह पुर्ववत चालू झाल्यानंतर देण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी.

## कंत्राटा संबंधिच्या अटी व शर्ती

१. उपहारगृह/मेस समितीमार्फत निश्चित करण्यात आलेली जागा निवड करण्यात येणा-या कंत्राटदारास उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचे मासीक शुल्क सार्वजनिक विभाग यांचे कडुन जागेचे भाडे आकारणी होइस्तोवर रुपये २०००/- (दोन हजार फक्त) हे रोखपाल, श्री व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचे कडे दर महीन्याला जमा करावे लागेल.

२. विद्युत विभागाकडुन वेगळे विजेचे मिटर लावून देईपर्यत मासिक विज शुल्क रुपये ३०००/- (तीन हजार फक्त ) आकारण्यात येईल. ज्याचा भरणा दर महिण्याला अग्रीम रोखपाल, श्री व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे भरुन रितसर पावती घ्यावी लागेल.

३. पाण्याच्या बिलापोटी मासिक शुल्क रुपये ५००/- आकारण्यात येईल. ज्याचा भरणा दर महिन्याला रोखपाल, श्री व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे भरुन रितसर पावती घ्यावी लागेल.

४. कंत्राटाची हमी म्हणून मान्य होण्या-या कंत्राटदारास रुपये ३०,०००/- (तीस हजार फक्त) सुरक्षा ठेव जमा करावी लागेल जी कंत्राटचा कालावधी पूर्ण झाल्यावर कंत्राटदारास परत करण्यात येईल.

५. कंत्राटाचा कालावधी हा ११ महिन्याचा राहील. त्यानंतर कंत्राट पुढे चालू ठेवावा किवा नाही या बाबत उपहारगृह/मेस समितीने घेतलेला निर्णय अंतीम राहील व तो कंत्राटदारास बंधनकारक राहिल. पुढे कंत्राट चालु ठेवावयाचा झाल्यास तो देखील ११ महिन्याकरीता नवीन करार करुन ठेवण्याचा अधिकार उपहारगृह/मेस समितीकडून राखून ठेवलेला आहे. एकाच कंत्राटदाराला कंत्राट सलग ३ वेळा मिळाल्यास त्यानंतर दरपत्रक प्रक्रिया परत नव्याने राबविण्यात येईल.

६. मुलींच्या वसतीगृहातील सदर कंत्राटासंबंधी महिला कंत्राटदारानेच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. इतर पुरष उमेदवारास दरपत्रक सादर करता येणार नाही. तसेच त्याठिकाणी काम करणारे कर्मचारी वर्ग देखील महिलाच असाव्यात.

७.करार कालावधीत कंत्राटदाराने जागेचा गैरवापर अथवा विद्यार्थी किवा कर्मचा-यांशी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राट रद्द करण्याचा अधिकार समितीकडे राहील.

८. कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणारे खाद्य पदार्थ निकृष्ट दर्जाचे आढळल्यास किंवा इतर कोणत्या सबळ कारणास्तव एक महिन्याची पूर्व सूचना देऊन कत्राट संपुष्टात आणण्याचा अधिकार उपहारगृह/मेस समितीकडे राहील.

९. मेसच्या कामकाजावर व दर्जावर नियंत्रण ठेवण्याचे काम उपहारगृह/मेस समिती करेल.

१०. मेसमधील स्वयंपाकगृहाकरीता लागणारे फर्निचर व इतर सामुग्री आदेश प्राप्त होणा-या कंत्राटदारास स्वतः आणावी लागेल.

११. मेसची जागा व सभोवतालचे परिसर स्वच्छ ठेवण्याची व शिळे अन्न कचरा व घाण संस्थेच्या परिसरातुन दूर नेऊन योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

१२. कर्मचारी अथवा विद्यार्थी यांना उधारीत माल दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी हि संबंधित कंत्राटदाराची राहिल. त्यांचे वसुली करिता मेस/उपहारगृह समिती कोणतीही मदत करणार नाही.

१३.पिण्याचे पाणी साठविण्याकरीता लागणा-या टाकीची व्यवस्था ही कंत्राटदारास स्वतंत्र करावी लागेल. तसेच पाण्याचे शुध्दिकरण करण्याचे यंत्र (वॉटर प्यूरिफायर) व वाटर कुलर यांचे वेळोवेळी मेंटेनंन्स करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१४. सिलेंन्डर चा वापर करतांना कमर्शियल सिलेन्डरचाच वापर करावा लागेल व त्याची व्यवस्था कंत्राटदारास स्वतःचे जबाबदारीवर करावे लागेल.

१५. दरपत्रक अर्जामध्ये दर्शविल्याप्रमाणे दररोज सकाळी, संध्याकाळी जेवण/नास्ता दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या किंमतीनुसार द्याव्या लागतील.

१६. विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल.

१७. अन्नातून विषबाधा किवा आरोग्यास अपाय झाल्यास संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. सदर नुकसानाची भरपाई कंत्राटदाराकुन केल्या जाईल.

१८. मेस मध्ये आग शॉर्टसर्कीट ईत्यादी मुळे दुर्घटना होणार नाही याची खबरदारी कंत्राटदारास घ्यावी लागेल दुर्घटना झाल्यास नुकसान भरपाई कंत्राटदाराकडून करण्यात येईल.

१९. या व्यवसायाचे आयकर/जीएसटी कर व शासनाचे लागु असलेले कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील आवश्यकता भासल्यास त्याची प्रत या कार्यालयास उपलब्ध करुन दयावी लागेल.

२०. वरील दरपत्रकात वेळेवर फेरबदल करण्याचे किवा दरपत्रक रदद करण्याचे अधिकार उपहारगृह/मेस समिती यांना राहातील.

२१. कंत्राटदारास मेस/उपहारगृहाकरीता हस्तांतरीत करण्यात आलेल्या इमारतीचा रितसर ताबा घ्यावा लागेल व परत सोडतांना रितसर ताबा द्यावा लागेल. इमारतीचे नुकसान झाल्यास नुकसानाची भरपाई कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येईल.

२२. मेसच्या सभासदाबाबत काही तक्रार असल्यास त्याची तक्रार मेस समिती अथवा वार्डन मार्फत मा. अधिष्ठाता, यांचेकडे करता येईल.

२३. कंत्राटदारास मेस व्यतिरिक्त कोणताही व्यवसाय किवा घरगुती मेस चालविता येणार नाही.

२४. मेसच्या मेनू व्यतिरीक्त अतिरीक्त पदार्थ इत्यादीची मागणी केल्यास त्याची व्यवस्था ठेवण्यात यावी व त्याचे दर स्वतंत्रपणे फलकावर लावण्यात यावे.

२५. मेस मध्ये काम करणा-या कर्मचा-यांचा विद्यार्थ्यास कोणताही त्रास होणार नाही याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची राहील.

२६. सकाळी नास्त्याची वेळ स.०६.३० ते ९.३० राहील जेवणाची वेळ दु.१२.०० ते ३.०० व संध्या.नास्त्याची वेळ ४.०० ते ६.०० व रात्रीचे जेवणाची वेळ ७.०० ते ९.०० राहील, रात्री मेसचा कर्मचारी उपलब्ध राहील. आठवडयातून १ दिवस बदल व १ दिवस फिस्ट (गोडजेवण/नॉनव्हेज) देणे आवश्यक राहील व तसेच सणाच्या दिवशी सुध्दा निवासी डॉक्टरांना फिस्ट देणे आवश्यक राहील. रविवारी पण मेस चालू ठेवण्यात यावी.

२७. **दररोज उपहारगृह/मेसमध्ये तयार होणारा नास्ता आणि जेवण प्रथमतः वस्तीगृह प्रमुख किंवा नेमून दिलेले प्रतिनिधी यांना चाचणी करिता उपलब्ध करुन दयावी लागेल तशी नोंदवही ठेवुन त्यामध्ये त्यांची नोंद घेऊन चाचणी करणा-या प्रतिनिधीचे नांव, शेरा व स्वाक्षरी घ्यावी लागेल. अशा चाचणीमधील सूचनांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. तसेच वारंवार प्रतिकुल शेरे प्राप्त झाल्यास ताबडतोब कंत्राट संपुष्टात आणण्याचा अधिकारी मेस/उपहारगृह समितीला राहील**

२८. कुठल्याही विद्यार्थ्यास किवा डॉक्टर यांचे रुमवर थाली पाठविल्या जाणार नाही.

२९.मेस चालकाची निवड ही जेवणाच्या शुल्काच्या आधारे करण्यात येईल. तसेच उपहारगृहातील पदार्थाचे शुल्क हे तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर किंवा समिती निश्चित करुन देईल त्या दराने निश्चित करण्यात येईल.

३०. कंत्राटदाराला उपहारगृह/मेसमध्ये कायम वास्तव्य करता येणार नाही. कुठल्याही परिस्थितीत बाल कामगार तसेच पुरुष कामगार ठेवता येणार नाही.

३१. रोजच्या जेवणामध्ये दोन भाज्या, पोळी, वरण,भात या व्यतिरिक्त चटणी, लोणचे, कांदा व लिंबु यांचा समावेश असावा.

३२. सभासदांची मेसबाबत काही तक्रार असल्यास ती नोंदविण्याकरिता मेसमध्ये तक्रार पुस्तिका ठेवण्यात यावी. व ती वस्तीगृहाचे वार्डन यांना वेळोवेळी दाखविण्यात यावी.

**तसेच या सर्व बाबी अटी व शर्ती नमुद करुन त्या मान्य असल्याचे रुपये १००/- स्टॅम्प पेपरवर वरील करारपत्र स्वाक्षरी व शिक्का व दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मेस व उपहारगृहाच्या जागेचा ताबा आपणास देण्यात येणार नाही.**

## दराबाबतची माहिती

दरासंबंधी व आकारमान/वजन इत्यादीची माहिती सदरहू माहिती स्वतंत्र लिफाप्यात बंद करुन उपरोक्त सुचनेप्रमाणे सादर करण्यात यावी तांत्रिक लिफाप्यात सदरहू माहिती सादर करण्यात येवू नये.

***मुलींचे वसतीगृह मेस मधील जेवणाचे दर***

| अ.क्र. | विवरण | दर |
|---|---|---|
| १ | मासीक शुल्क | |
| २ | १५ दिवसाचे शुल्क | |
| ३ | एक वेळच्या जेवनाचे शुल्क | |
| ४ | गेस्ट शुल्क | |
| ५ | राईस प्लेट शुल्क | |

सकाळच्या जेवणामध्ये एक भाजी, वरण, चपाती, भात चटणी, पापड, लोणचे, कांदा,लिंबु व सलाद यांचा समावेश असावा.

संध्याकाळच्या जेवणामध्ये एक भाजी,वरण,चपाती,भात, चटणी,पापड ई.चा समावेश असावा.

कोणतीही भाजी, कडधान्य भाजी केलेल्या दिवसानंतर चार दिवसापर्यंत करता येणार नाही. जेवणामध्ये वेगवेगळया पदार्थांचा समावेश असावा.

मेस/उपहारगृह समितीची परवानगी घेऊन त्यांच्या सूचनेनुसार बदल म्हणून एखाद्या दिवशी मेनूमध्ये बदल करता येईल. म्हणजे खिचडी, भाकरी बेसन ई. तसेच वार्डन यांचेशी एक आठवडयाचे मेनूचे वेळापत्रक तयार करुन घ्यावे लागेल व त्यानुसार जेवण उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

## नवीन मुलींचे वसतीगृहाकरिता उपहार गृहाचे दर

| विवरण | परिणाम | | दर |
|---|---|---|---|
| चहा | अर्धा कप | (७५ मि.लि.) | |
| | पुर्ण कप | (१५० मि.लि.) | |
| कॉफी | अर्धा कप | (७५ मि.लि.) | |
| | पुर्ण कप | (१५० मि.लि) | |
| दुध | अर्धा कप | (७५ मि.लि.) | |
| | पुर्ण कप | (१५०मि.लि.) | |
| ब्रेड बटर | ०२ नग | २ ब्रेड व १० ग्रॅम बटर | |
| टोस्ट बटर | ०२ नग | ०२ टोस्ट व १० ग्रॅम बटर | |
| ब्रेड जाम | ०२ नग | ०२ ब्रेड व जाम | |
| समोसा, | ०२ नग | प्रतिनग ६० ग्रॅम व टोमॅटोसॉस | |
| कचोरी | ०१ नग | ४० ग्रॅम व टोमटोसॉस | |
| आलुबोंडा | ०२ नग | (५० ग्रॅम प्रतिनग) व टोमटोसॉस | |
| पोहे | एक प्लेट | १०० ग्रॅम | |
| उपमा | एक प्लेट | १५० ग्रॅम व चटणी ४० ग्रॅम | |
| साबुदाणा उसळ | एक प्लेट | १५० ग्रॅम | |
| साबुदाणा वडा | ०१ नग/ | १०० ग्रॅम प्रतिनग | |
| | ०२ नग | | |
| ऐग आम्लेट | ०१ अंडयाचे | — | |
| | ०२ अंडयाचे | | |

वरील पदार्थासाठी लागणारी बाहेरुन विकत घेतलेली विविध सामुग्री ही चांगल्या कंपनीची व प्रतीची असावी. उदा.चहापत्ती, कॉफी, दुध, ब्रेड, सॉस, पाव व इतर मसाल्याचे पदार्थ ई.

अधिष्ठाता,
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
यवतमाळ.